दाखल तारीख – १३–०७–२०१६
नोंदणी तारीख – १३–०७–२०१६
निकाल तारीख – १२–०४–२०१८
कालावधी– १ वर्षे ८ महिने ३० दिवस

# न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, तासगांव यांचे न्यायालय

**(पीठासीन अधिकारी सौ.टी.एस. महाडिक २रे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,तासगांव)**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक ९४/२०१६**

**निशाणी क्रमांक**

महाराष्ट्र सरकार,
तर्फे तासगांव पोलीस ठाणे, – **फिर्यादी.**
जि.सांगली.

**विरुध्द**

१. सुभाष बापु जाधव, – **आरोपी.**
वय ३६ वर्षे, धंदा – मजुरी,
२. सुखदेव काकासो. जाधव,
वय २८ वर्षे, धंदा – मजुरी,
३. नानासाहेब उर्फ नानासो. गणपती जाधव,
वय ४० वर्षे, धंदा – मजुरी,
४. आप्पासाहेब गणपती जाधव,
वय ४५ वर्षे, धंदा – मजुरी,
५. धनाजी आप्पासाहेब जाधव,
वय २० वर्षे, धंदा – मजुरी,
६. रमेश रामचंद्र जाधव,
वय ३८ वर्षे, धंदा – मजुरी,

७. शशिकांत प्रल्हाद जाधव, **– आरोपी**
वय ३८ वर्षे, धंदा – मजुरी,
८. विश्वास महिपती जाधव,
वय २२ वर्षे, धंदा – मजुरी,
९. विनायक आत्माराम जाधव,
वय ४५ वर्षे, धंदा – मजुरी,
१०. सिताराम राजाराम जाधव,
वय ६६ वर्षे, धंदा – मजुरी,
११. प्रताप हिम्मत जाधव,
वय २१ वर्षे, धंदा – मजुरी,
१२. विशाल महिपती जाधव,
वय १९ वर्षे, धंदा – मजुरी,
१३. प्रकाश बापु जाधव,
वय ५० वर्षे, धंदा – मजुरी,
१४. सचिन आप्पासाहेब जाधव,
वय २१ वर्षे, धंदा – मजुरी,
१५. दादासो. गणपती जाधव,
वय ५३ वर्षे, धंदा – मजुरी,
१६. काकासाहेब गणपती जाधव,
वय ५७ वर्षे, धंदा – मजुरी,
१७. राजकुमार तात्यासो. जाधव,
वय २१ वर्षे, धंदा – मजुरी,
१८. प्रताप सिताराम जाधव,
वय ३४ वर्षे, धंदा – मजुरी,
१९. करण विनायक जाधव,
वय १९ वर्षे, धंदा – मजुरी,

आरोपी क्र.१ ते १९ सर्व रा.जुळेवाडी,
ता.तासगांव, जि.सांगली.

******

फिर्याद – भा.द.वि.सं. कलम प्रमाणे १४३, १४७, १४८,
३२४, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ अन्वये

******

अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता – श्री.व्ही.ए. पाटील वकील
आरोपी क्र. १ ते १९ तर्फे विधीज्ञ – श्री.ए.पी. साठे वकील

**– न्यायनिर्णय –**

**(दिनांक १२.०४.२०१८ रोजी जाहीर)**

१. प्रस्तूतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ अन्वये गुन्हा केल्याची तोहमत आहे.

२. अभियोग पक्षाच्या प्रकरणाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

दिनांक ०५–०५–२०१६ रोजी मौजे जुळेवाडी गांवचे हद्दीत गोसावी वस्तीतील समाज मंदिरलगत ग्रामपंचायत जमीन गट नं.१९९ अ मध्ये अतिक्रमण करुन घरे बांधली आहेत. सदर घरे त्यांनी काढून घ्यावीत म्हणून फिर्यादी विकास जयराम जाधव यांनी गटविकास अधिकार तसेच, उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे यापूर्वी तक्रारी अर्ज केलेले आहेत तो मनात राग धरुन यातील आरोपी क्र.१, ४, १५ व १६ यांनी फिर्यादीस आमच्या घराच्या बाबतीत आमच्या मागे हात धुवून का लागला आहेस असे

म्हणून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण चालु केली आणि आरोपी क्र.४ याने हातातील गज फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी केले. आरोपी क्र.१६ याने त्याच्या हातातील काठीने फिर्यादीच्या उजव्या हाताच्या यमनगटावर मारली तसेच, आरोपी क्र.१ याने त्याच्या हातातील चाकु फिर्यादीवर उगारला तेंव्हा फिर्यादी मोठमोठयाने ओरडल्याने त्यांचा आवाज ऐकून भांडणे सोडविण्यासाठी आलेले साक्षीदार यांना डोक्यात, हातावर, पायावर, पाठीत मारहाण करुन जखमी केले व शिवीगाळ, धमकी दिली म्हणून आरोपीच्या विरुध्द पोलीस ठाणेमध्ये फिर्याद नोंदविली. पोलीस हेड कॉन्स्टेबल श्री.पी.पी. शिंदे यांनी सदर गुन्हयाचा तपास करुन आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**३.** निशाणी क्र.४२ अन्वये आरोपीवर कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ करिता दोषारोप निश्चित करुन गुन्हयाचे घटक समजावून सांगण्यात आले ते त्याने पूर्णपणे नाकारले व गुन्हयाच्या चौकशीची मागणी केली. त्याप्रमाणे आरोपीविरुध्द सदर खटला पुढे चालविण्यात आला.

**४.** सुनावणी दरम्यान पक्षकारांमध्ये समजुत झाल्याबाबत अर्ज निशाणी ७२ अन्वये व पुरसिस निशाणी ७३ दाखल करण्यात आले आहे. आरोपींच्या विरुध्द भारतीय दंड विधान कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ प्रमाणे दाखल केले आहे. प्रस्तुतचा गुन्हा हा समजुतपात्र नसल्याने प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात आला आहे.

**५.** साक्षीदारांचे जाब जबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का कि, दि. ०५.०५.२०१६ रोजी १०–३० वाजणेचे सुमारास मौजे जुळेवाडी गांवचे हद्दीत फिर्यादी व साक्षीदार यांचे घरात व घरासमोर यातील आरोपींनी बेकायदेशीर जमाव केला आहे काय ? | नाही |
| २. अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का कि, वर नमूद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपींनी बेकायदेशीर जमाव करुन लाथाबुक्कयाने मारहाण करुन फिर्यादीस व साक्षीदारास जखमी केले आहे काय ? | नाही |
| ३. अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का कि, वर नमूद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपी हे बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते काय ? | नाही |
| ४. अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का कि, वर नमूद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१, ४, १५ व १६ यांनी ग्रामपंचायत हद्दीमध्ये समाजमंदिर जगत अतिक्रमण करुन बांधलेली घरे काढून घ्यावीत म्हणून फिर्यादीने केलेल्या तक्रारी अर्जाचा राग मनात धरुन फिर्यादी व साक्षीदार यांना हत्याराने मारहाण केल्याचे सिध्द केले आहे काय ? | नाही |
| ५. अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का कि, वर नमूद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना लाथाबुक्यानी मारहाण केल्याचे सिध्द केले आहे काय ? | नाही |
| ६. अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का कि, वर नमूद दिवशी वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ केली आहे काय ? | नाही |
| ७. अभियोग पक्षाने हे शाबीत केले आहे का कि, वर नमूद | नाही |

दिवशी वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांना जीवे मारणेची धमकी दिल्याचे सिध्द केले आहे काय ?

८. काय आदेश — अंतिम आदेशानुसार

## – कारणमिमांसा –

६. अभियोगपक्षाने घटनेच्या पृष्ट्यर्थ खालील साक्षीदार तपासलेले आहेत.

* साक्षीदार क्रमांक १ बबन बाळु जाधव, निशाणी क्रमांक ६७.
* साक्षीदार क्रमांक २ विकास जयराम जाधव, निशाणी क्रमांक ७४.

आरोपींनी त्यांच्या बचावासाठी स्वतःची अगर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली नाही. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

## मुद्दा क्रमांक १ ते ७ करिता

७. या कामी फिर्यादी व आरोपी यांनी नि.क्र.७३ कडे पुरशिस देवून सदरची केस तडजोड करणेची परवानगी मागितली. परंतू आरोपीं विरूध्दचा गुन्हा हा तडजोडपात्र नसलेने सदरची पुरशिस दप्तरी दाखल करणेत आली. या पार्श्वभुमीवर आरोपी वरील आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने दोन साक्षीदार तपासले. अभियोगपक्षाने नि.क्र.६७ अन्वये साक्षीदार क्र.१ बबन बाळु जाधव पंच साक्षीदार यांची साक्ष नोंदविली. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहाय्य होईल अशी साक्ष नोंदविली नाही तसेच साक्षीदार क्र.२ विकास जयराम जाधव फिर्यादी यांची साक्ष नि.क्र.७४ कडे नोंदविली. सदर साक्षीदाराने आरोपी व त्याच्यामध्ये किरकोळ वाद होता घटनेदिवशी तो जुळेवाडी येथे गोसावी समाज मंदिराच्या चौकात जो वाद सुरु होता ते पाहण्यासाठी गेला होता त्याला घटनेबाबत

काहीही माहीती नसल्याचे त्याने सांगितले. या कामी फिर्यादी व आरोपी यांचेत कोर्टाबाहेर तडजोड झालेने त्यांनी इतर साक्षीदार अथवा तपासी अंमलदार तपासले नाहीत.

८. या कामी सरकारपक्षाने तपासलेल्या साक्षीदाराच्या जबाबाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, साक्षीदार सरकारपक्षास फितूर झाले आहेत. त्यांनी आरोपींविरूध्द काहीही सांगितलेले नाहीत. त्यामुळे फिर्यादी व आरोपी यांचेत कोर्टाबाहेर तडजोड झाल्याने फिर्यादीने आरोपी विरूध्द कोणताही जबाब दिलेला नाही असे दिसून येते. तसेच, या कामी सरकारपक्षाने इतर कोणतेही साक्षीदार अथवा तपासी अंमलदार देखील या कामी तपासलेले नाहीत. तसेच, पोलीस स्टेशनमध्ये मुद्देमाल कारकुनास वारंवार मुद्देमाल न्यायालयात जमा करण्याबाबत पत्र पाठविले असता तसेच, तोंडी सुचना दिले असता संबंधित कारकुनाने मुद्देमाल न्यायालयात जमा केलेला नाही. आरोपी व फिर्यादीमध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याने फिर्यादीने अभियोग पक्षास सहाय्य होईल अशी साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे उपलब्ध साक्षीपुराव्याच्या आधारे आरोपीस दोषी धरता येणार नाही. या सर्व कारणास्तव मी मुद्दा क्र.१ ते ७ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.८ करीता खालील आदेश पारीत करत आहे.

## – आदेश –

१. आरोपी क्रमांक १. सुभाष बापु जाधव, २. सुखदेव काकासो. जाधव, ३. नानासाहेब उर्फ नानासो. गणपती जाधव, ४. आप्पासाहेब गणपती जाधव, ५. धनाजी आप्पासाहेब जाधव, ६. रमेश रामचंद्र जाधव, ७.शशिकांत प्रल्हाद जाधव, ८. विश्वास महिपती जाधव, ९.विनायक आत्माराम जाधव, १०. सिताराम राजाराम जाधव, ११. प्रताप हिम्मत जाधव, १२. विशाल महिपती जाधव, १३. प्रकाश बापु जाधव, १४. सचिन आप्पासाहेब जाधव, १५. दादासो. गणपती

**जाधव, १६. काकासाहेब गणपती जाधव, १७. राजकुमार तात्यासो. जाधव, १८. प्रताप सिताराम जाधव आणि १९. करण विनायक जाधव** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी ५,०००/– रुपयांचे बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत सादर करावे.

४. सदर कामी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल तीन कळकाचे दांडके, दोन लोखंडी गज, एक पांढ–या रंगाचा चाकु आणि तीन ओबडधोबड आकाराची दगडे इत्यादि अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे.

sd/–xxx

**<u>तासगांव.</u>** **(सौ.टी.एस. महाडिक)**

**दिनांक – १२.०४.२०१८** **२रे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, <u>तासगांव.</u>**

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)**